# स्वरमंडळ

## अशोक दामोदर रानडे

(मूळ प्रसिद्धी - दीपावली, संपा. वसंत पळशीकर, १९६८)

**स्वर मंडळ : १**

व्यर्थ !
शेरा मारून हात झटकणाऱ्यांच्या ढेकरेला
हिरवा वास येत होता.
"व्यर्थी अधिकरुचि अर्थ"...
इत्यादींचा अर्थ शोधणाऱ्या
हाताने गाणे दाखविणाऱ्यांची वर्दी लागली
तरी माना डोलावतात!
आणि मी म्हणे दर्दी!
उगाच कोण कुणाला सुरेल म्हणत नाही.
सूर सूऽऽर मारतो स्वराच्या गर्भकोषांत,
प्रयत्नांच्या प्रस्तरांत लुकलुकून चिडवणारे रेडीयम!
गाणाऱ्याची वाचा बसते.
बसणाऱ्याची टाच झिजते.
खिन्न स्वर पुन्हा एकदा निःश्वास सोडून वाट पाहातो
अहिल्येच्या दगडांत.
स्वरवेड्याची लाथ लागण्याची.

**स्वरमंडळ : २**

'दादऱ्यांत मस्ती हवी'
इति खांसाहेब.
'मागणाऱ्यानं वेळ पाहावी
मागतो त्याची जात जाणावी'
इति कुटलेल्या पानासह रोशनबी.
बिस्किटाच्या डब्यांत चहा बुडवून बोटे तट्ट फुगली
म्हणजे वाजणारा दादरा फक्त जस्तई असतो.
दादऱ्याची कश्ती डगमगायला लागली
की चुनाळ थकल्या बोटांनी रक्तपिंजर लावावा.
दादऱ्याचे सौभाग्य राखावे.

**स्वर मंडळ : ३**

परवा कोणी वादंगले
पूरियाचा निषाद तीव्र नाही.
मी म्हणालो बोकडाची दाढी कापून
शेळी तयार होत नाही.
गोडव्यांत घोळला तरी तीव्र टोंकरतोच.
पर्वताएवढा आ करून
सुईसारखा निषाद लावावा.
पांगाऱ्याची बी सुंठेत उगाळून
निखाऱ्यासकट गिळावी.
असे केल्याने काय होते?
होणाऱ्याची जान जाते
करणाऱ्याची मान राहाते
उगाच कशाला वाद!